|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

---

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/हस्तदेय/२०२६    By Email    दि.२४/०४/२०२५

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय :- उन्हाळी परीक्षा २०२६ - उत्तरपत्रिका बंडल संदर्भात आढळलेल्या त्रुटी व त्या बाबत सुचना**

**महोदय / महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्फत उन्हाळी २०२६ या परीक्षांचे आयोजन सुरू असून, महाविद्यालयांकडून विद्यापीठाकडे पाठविण्यात येणा-या उत्तरपत्रिका बंडलमध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

१. काही बंडलवर नमूद विषय / पेपरचे नाव व प्रत्यक्ष बंडलमधील उत्तरपत्रिका यामध्ये विसंगती आढळते.
२. काही बंडलमध्ये कनिष्ठ पर्यवेक्षक (Junior Supervisor) यांचा JSR अहवाल (JSR Report) संलग्न केलेला आढळून येत नाही.
३. NEP - २०२० अंतर्गत काही विषय अंतर-शाखीय (Interdisciplinary) असल्यामुळे ते एकत्रित एकाच बंडलमध्ये पाठविले जात आहेत.
४. बंडल पाठवितांना आवश्यक ती तपासणी न केल्यामुळे त्रुटी निर्माण होत आहेत.

वरीलप्रमाणेच्या त्रुटी अत्यंत गंभीर स्वरूपाच्या असून मूल्यमापन प्रक्रियेत अडथळे निमार्ण होतात. तरी सर्व महाविद्यालयांनी याची गांभीर्याने नोंद घेऊन पुढीलप्रमाणे काटेकोरपणे पालन करावे.

- प्रत्येक बंडलवरील तपशील व प्रत्यक्षातील उत्तरपत्रिका यामध्ये सुसंगती ठेवावी
- प्रत्येक बंडलसोबत कनिष्ठ पर्यवेक्षकाचा JSR अहवाल अनिवार्यपणे संलग्न करावा
- बंडल पाठविताना वरिष्ठ पर्यवेक्षक (Senior Supervisor) व डिस्पॅच क्लर्क यांनी योग्य तपासणी करावी.
- काही विषयांचे नाव समान असले तरी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून त्यांना वेगवेगळे Unique Code देण्यात आलेले आहेत. अशा प्रकरणात, केवळ विषयाचे नाव समान असल्यामुळे उत्तरपत्रिका एकाच बंडलमध्ये पाठवू नयेत. संबंधित उत्तरपत्रिका Unique Code व Computer Code नुसार स्वतंत्र बंडलमध्येच पाठविणे आवश्यक आहे.

तसेच, वरीलप्रमाणे दिलेल्या सुचनांचे पालन न झाल्यास संबंधित कर्मचारी तसेच महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल:

तरी, आपणास याव्दारे सुचित करण्यात येते की, वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

कळावे,

**(प्रा. योगेश पाटील)**
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
कबचौ उमवि, जळगाव

प्रत: १. मा. कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव